**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **एआय इम्पॅक्ट समिट कृत्रिम बुद्धिमत्तेचा जगभरात उपयोग करण्याच्या दिशेने महत्वाचा टप्पा ठरल्याचं पंतप्रधानांचं 'मन की बात'मधे प्रतिपादन.**
2. **विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधकांचा चहापानावर बहिष्कार.**
3. **मुदत संपणाऱ्या १४ हजार २३४ ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचच प्रशासक ठेवण्याचा राज्य शासनाचा निर्णय.**
4. **संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी भारत मुक्ती मोर्चाचं आज नागपुरात आंदोलन.**
5. **पुरुषांच्या क्रिकेट टी-ट्वेंटी विश्व चषक स्पर्धेत आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात लढत.**

**मन की बात**

नवी दिल्ली इथं नुकतीच पार पडलेली इंडिया AI इम्पॅक्ट समिट अर्थात जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव शिखर परिषद ही आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग जगभरात कसा केला जाईल, या दिशेनं एक महत्त्वाचं वळण ठरल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३१ वा भाग होता.- ऐकुया याबाबत सविस्तर वृत्तांत- आमच्या प्रतिनिधी कडून

***दिल्लीत नुकत्याच पार पडलेल्या जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल पंतप्रधानांनी मन कि बात द्वारे समाधान व्यक्त केलं. अनेक देशांतील नेते, उद्योग क्षेत्रातील अग्रणी इनोवेटर्स आणि स्टार्टअप क्षेत्राशी संबंधित लोक या परिषदेत सहभागी झाल्याने ही परिषद एक महत्वाचा टप्पा ठरली असं पंतप्रधान म्हणाले. या परिषदेदरम्यान भारताने तीन मेड इन इंडिया एआय मॉडेल लॉन्च केले आहे.***

***सध्या सुरू असलेल्या टी २० विश्वचषकात अनेक देशांच्या क्रिकेट संघातून खेळणारे खेळाडू हे भारतीय वंशाचे असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. कॅनडा, अमेरिका, न्यूझीलंड,UAE, इटली या संघांमध्ये भारतीय वंशांच्या खेळाडूंनी आपलं स्थान निर्माण केलं असल्याने आपल्या देशाचा गौरव वाढला असल्याचं मोदी म्हणाले.***

***अवयवदाना विषयी बोलताना केरळ मधील आलिन शेरीन अब्राहम या १० महिन्याच्या मुलीबद्दल पंतप्रधानांनी आवर्जून सांगितलं. ती दगावल्यानंतर वडील अरुण अब्राहम आणि आई शेरीन यांनी तिच्या अवयव दानाचा संकल्प पूर्ण कला. त्यामुळे सर्वात लहान वयाच्या अवयव***

*दात्यांमध्ये तिचं नाव जोडलं गेल्याचं पंतप्रधान म्हणाले. अवयवादानाच्या माध्यमातून इतरांना नवीन आयुष्य देणाऱ्यांबद्दल पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली.*

*उद्यापासून राष्ट्रपती भवनात राजाजी उत्सव साजरा होणार आहे, त्याची माहिती मन की बात मधून पंतप्रधानांनी दिली. या उत्सवात राष्ट्रपती भवनाच्या केंद्रीय प्रांगणात स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय गव्हर्नर जनरल सी राजगोपालाचारींच्या प्रतिमेच अनावरण केलं जाईल.*

*आज मन कि बात मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाढणारे सायबर गुन्हे, डिजिटल अरेस्ट आणि डिजिटल फ्रॉड बद्दल नागरिकांना जागरूक राहण्याचं आवाहन केलं. त्याचबरोबर आपली केवायसी पूर्ण करण्यासाठी सुद्धा आवर्जून सांगितलं. यासंदर्भात रिझर्व बँकेच्या वित्तीय साक्षरता सप्ताहाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.*

*आपले शेतकरी केवळ अन्नदाता नाहीत, तर ते आपल्या भूमीचे खरे साधक आहेत असं पंतप्रधान म्हणाले. देशातला शेतकरी पारंपरिक पद्धत आणि तंत्रज्ञानाच्या सोबतीनं वाटचाल करतो आहे, असं त्यांनी सांगितलं. याबाबतीतल्या यशस्वी प्रयोगांची उदाहरणंही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली.*

*आगामी रमझान आणि होळीच्या सणात व्होकल फॉर लोकलचा मंत्र जपावा आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यात हातभार लावावा, असं आवाहन त्यांनी केलं. येत्या २४ फेब्रुवारीला तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री दिवंगत जयललिता यांची जयंती असल्याचं स्मरण करत त्यांनी आदरांजली वाहिली.*

**चहापान बहिष्कार**

विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी पक्षानं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला आहे. प्रचंड बहुमतामुळे सत्ताधारी पक्षाचं वर्तन सभ्यपणाचं नाही, जिथं लोकशाहीचा मान राखला जात नाही तिथं आपण चहापानाला जाणार नाही असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी सांगितलं. उद्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी आज मुंबईत आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. भारत-अमेरिका करार हा पूर्णपणे शेतकरी विरोधी असल्याची टीका जाधव यांनी केली. उप-मुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबतही अनेक शंका आहेत, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. राज्यातली बेरोजगारी, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, रखडलेले विकास प्रकल्प, शेतमालाला मिळणार अल्प मोबदला या आणि इतर मुद्द्यांवर कॉँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी टीका केली.

**सरपंच मुदतवाढ**

राज्यातील सुमारे १४ हजार २३४ ग्रामपंचायतींची पाच वर्षांची मुदत २८ फेब्रुवारी २०२६ रोजी संपत आहे. प्रभाग रचनेच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर या ग्रामपंचायतींवर बाहेरील सरकारी अधिकारी प्रशासक म्हणून नियुक्त करण्याऐवजी, आता विद्यमान सरपंचांनाच 'प्रशासक' म्हणून जबाबदारी देण्याचे अधिकृत परिपत्रक सरकारनं जारी केल आहे. बुलढाणा जिल्ह्यातील 525 ग्रामपंचायतींना दिलासा मिळाला असून गावांचा विकास आणि ग्रामपंचायत यांचे सक्षम प्रशासन हीच आमची प्राथमिकता आहे अशी भूमिका बुलढाणा सरपंच संघटनेचे रामा थारकर- पाटील यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण राजकारणाला एक नवी दिशा देणाऱ्या या निर्णयामुळे गावपातळीवरील प्रशासनात सातत्य राहणार असून अचानक होणाऱ्या बदलामुळे विकासकामात निर्माण होणारी पोकळी टळणार असल्याच मत सरपंच संघटनेने व्यक्त केलं आहे.

**बामसेफ आंदोलन**

भारत मुक्ति मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या नेतृत्वात आज नागपुरात संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी आंदोलन करण्यात आलं. बामसेफ आणि भारत मुक्ति मोर्चाच्या राष्ट्रीय अधिवेशनास परवानगी नाकारल्याच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर मोर्चा नेण्याची परवानगी मागितली होती. मात्र, पोलिस प्रशासनाने ती परवानगी नाकारली. त्यामुळे आंदोलनाचे ठिकाण बदलून संविधान चौक येथे महारॅली आयोजित करण्यात आली. या महारॅलीत राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा आणि राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा यांसह देशभरातील हजारो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. दरम्यान, प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून महाल परिसरातील बडकस चौक इथं राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी तैनाती केली आहे. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आणि रेशीमबाग येथील स्मृती मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली. दिनांक २६ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान ओडिशातील कटक येथे बामसेफ आणि भारत मुक्ति मोर्चाचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. मात्र, सरकारने या अधिवेशनास परवानगी नाकारली होती. या निर्णयामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दबाव असल्याचा आरोप संबंधित संघटनांनी केला असून, त्याच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आलं.

**अपघात**

तामिळनाडूमध्ये चेन्नई इथल्या गोल्डन बीचवर काल झालेल्या दुर्घटनेत वाहून गेलेल्या ३ जणांपैकी एक युवती भंडारा जिल्ह्यातल्या मोहाडी तालुक्यातली असून, स्थानिक प्रशासनानं तिच्या कुटुंबियांशी संपर्क साधला आहे. चेन्नईमधल्या एका आयटी कंपनीत काम करणाऱ्या

महाराष्ट्रातल्या १५ तरुणांचा गट काल गोल्डन बीच जवळच्या समुद्रात गेला होता. त्यावेळी उसळलेल्या लाटांच्या प्रवाहात ३ जण वाहून गेले. त्यापैकी एका युवकाला बचाव पथकानं सुरक्षितपणे बाहेर काढलं, तर एक जण अद्याप बेपत्ता आहे.

**शहिद नेतराम कटरे**

गोंदिया जिल्ह्याच्या सालेकसा तालुक्यातील पिपरिया इथले लष्कर सुभेदार नेतराम कटरे हिमाचल प्रदेशात कर्तव्य बजावताना शहीद झाले. त्यांच्या पार्थिवावर आज त्यांच्या मुळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातले हजारो नागरिक उपस्थित होते. यावेळी शहीद सुभेदार नेतराम कटरे यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेट टीट्वेंटी विश्व चषक स्पर्धेच्या सुपर 8 मधे आज संध्याकाळी ७ वाजता अहमदाबाद इथं भारत विरुद्ध दक्षिण अफ्रिका यांच्यात लढत होणार आहे.

*****